सुधारणा व पुनर्वसन

महाराष्ट्र शासन

**विशेष कारागृह महानिरीक्षणालय, कारागृहे व सुधारसेवा,**

**मध्य विभाग, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००८**

दुरध्वनी क्र. (०२४०) २३८१०४८/२३९३४२२ ई-मेल-**digaurangabad-mh@mah.gov.in**

**<u>महत्त्वाचे</u>**

जा.क्र.इएसटी/कारागृह शिपाई/ भरती/कागदपत्र पडताळणी/२९४२/२०२६/ क-५, छ.सं.नगर दि.१२.०८.२०२६

**// उमेदवारांना सूचना //**

**विषय:- मा.पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर यांचे संकेत स्थळावर प्रसिध्द झालेल्या अंतिम प्रतिक्षा यादीतील प्रवर्गनिहाय आवश्यक व अतिरिक्त उमेदवारांचे मूळ दस्तऐवज पडताळणीबाबत..**

**संदर्भ:-** १. मा.पोलीस आयुक्त, संभाजीनगर यांचे कार्यालयाचे पत्र क्र १३४१५/२०२५ दि.२९.०८.२०२५.

२. या कार्यालयाकडील सुचना प्रसिध्दीपत्रक क्र. २८७६/२६ दि.०६.०८.२०२६

कारागृह विभागात मध्य विभागातील कारागृहांतर्गत कारागृह शिपाई (अराजपत्रित गट - क) या संवर्गातील एकूण ३१५ रिक्त पदे भरणेकरीता पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या कारागृह शिपाई पदभरती ( मध्य विभाग) सन २०२२-२३ अंतर्गत शारिरीक व मैदानी चाचणी परीक्षेत व लेखी परीक्षेत प्राप्त गुणांनुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण तसेच समान गुण मिळालेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेऊन कारागृह शिपाई एकूण ४०१ पदांची प्रवर्गनिहाय अंतिम प्रतिक्षासुची/प्रतिक्षायादी मा. पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून संदर्भांकीत पत्रान्वये प्राप्त झालेली आहे. सदरची यादी कारागृहाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द दि.१६.०९.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कारागृह विभागाचे कारागृह शिपाई संवर्गातील अंतिम निवड यादीतील उमेदवार गैरहजर राहील्याने/त्यांची नियुक्ती रद्द केल्याने/हक्कसोड पत्र दिल्याने त्यांचे प्रवर्गनिहाय अंतिम प्रतिक्षा यादीत नमूद ०१ उमेदवार व त्यापुढील ०३ अतिरिक्त उमेदवार (सोबत जोडलेल्या यादीतील) यांना दिनांक ११.०८.२०२६ रोजी कागदपत्र पडताळणीस हजर राहणेबाबत संदर्भ क्र.२ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये कळविण्यात आले होते. परंतु सदर कागदपत्र पडताळणीस सर्व उमेदवार (सोबत जोडलेल्या यादीतील) गैरहजर होते. **<u>सदर गैरहजर उमेदवारांना याव्दारे कागदपत्रा पडताळणीस हजर राहणेकामी द्वितीय संधी देण्यात येत आहे.</u>** ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज उदा. शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, समांतर आरक्षण संबंधी पुरावा व इतर दस्तऐवज यांची मूळ कागदपत्रे व त्यांच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह स्वत: (प्रतिनिधी चालणार नाही) दस्तऐवज पडताळणीकरीता सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे **<u>दिनांक १४.०८.२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता विशेष कारागृह महानिरीक्षणालय, कारागृह व सुधारसेवा, मध्य विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे समक्ष उपस्थित रहावे.</u>**

तसेच दस्ताऐवज पडताळणीचे वेळी येतांना, उमेदवाराने सोबत जोडलेल्या पोलीस पडताळणी साक्षांकन फॉर्म मधील अ.क्र.१९ नंतर नमुद ओळख प्रमाणपत्रावर **<u>( १. राज्य/केंद्र शासनाचे राजपत्रित अधिकारी २. संसद किंवा राज्य विधानमंडळाचे सदस्य ३. उपविभागीय दंडाधिकारी / अधिकारी ४. मामलेदार, तहसिलदार किंवा दंडाधिकाऱ्यांच्या शक्ती वापरण्यास प्राधिकृत केलेले नायब/उप तहसिलदार ५. सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे आणि / किंवा माध्यमिक शाळांचे प्राचार्य/मुख्यध्यापक) यांपैकी एका जबाबदार अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत महाआयटी प्राप्त ओखळपत्र व आवेदन अर्ज, स्वत:चे आधारकार्ड व त्यांची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.</u>**

उमेदवारांनी मूळ दस्तऐवज पडताळणीकरीता निश्चित करण्यात आलेली दिनांक ही **<u>https://mahaprisons.gov.in</u>** या संकेतस्थळावर पहावी.

२...

**मूळ दस्तऐवज तपासणीकरीता विहित प्रपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. सदर प्रपत्रातील सर्व माहिती अचूकपणे नमूद करण्यात यावी. व त्यासोबत नमूद केलेले सर्व मूळ कागदपत्रे व स्वसाक्षांकित प्रतीसह सोबत आणावयाचे आहेत.**

उमेदवार विहीत शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता धारण करीता नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**तसेच उपरोक्त नमूद दिवशी दस्तऐवज पडताळणीकरीता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन निवड रद्द केली जाईल व तद्नंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

**सदर यादीतील ०३ अतिरिक्त उमेदवारांना फक्त मूळ दस्तऐवज पडताळणीकरीता उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले आहेत. कागदपत्रे पडताळणीकरिता बोलाविण्यात आलेल्या अतिरिक्त उमेदवारांचा कारागृह शिपाई पदाकरिता अंतिम निवड झाल्याचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. सदर उमेदवारांना आवश्यकतेनुसार, पदांची उपलब्धता लक्षात घेऊन पुढील कार्यवाहीस उपस्थित राहणेबाबत स्वतंत्र सुचना कारागृहाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे असून दस्ताऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत मा.विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, मध्य विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व उमेदवारांस बंधनकारक राहील.

**(मा.वि.का.म.नि. यांचे मान्यतेने)**

**(नरेंद्र इंगळे)**
**स्वीय सहाय्यक,**
विशेष महानिरीक्षक,
कारागृहे व सुधारसेवा,
मध्य विभाग, छत्रपती संभाजीनगर

घटक/कार्यालयाचे नाव : Chhatrapati Sambhaji Nagar Prison Constable Recruitment 2022-2023
अहवालाचा प्रकार : Waiting List

Category : OBC　　Parallel Reservation : General　　Gender : Male

| Sr | Application No | Chest No | M/F | Name | Birth Date | Category | Parallel Reservation | NCC Marks | Physical Marks | Written Marks | Final Marks | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ.मा.व. सर्वसाधारण (OBC General) (Required Candidate 01) | | | | | | | | | | | | |
| 1 | 110380000032445 | **17494** | M | AJAY BHIMRAO KHAIRNAR | 20-10-2002 | OBC | None | 5 | 48 | 65 | **118** | OBC General |
| **(Extra Candidates for document verification only)** | | | | | | | | | | | | |
| 2 | 110380000032587 | **17152** | M | SANDIP NARAYAN GHADGE | 07-01-2003 | OBC | None | 0 | 45 | 73 | **118** | OBC General |
| 3 | 110380000008367 | **6081** | M | RAHUL SANDIP GHOTEKAR | 21-06-2003 | OBC | None | 0 | 43 | 75 | **118** | OBC General |
| 4 | 110380000049062 | **22682** | M | PRATIK BABULAL DAPKE | 20-06-2005 | OBC | None | 0 | 43 | 75 | **118** | OBC General |

(Narendra Ingle)
Personal Assistant
Spl. Inspector General Of Prison
Central Region, Chhatrapati Sambhajinagar.